# .. Law of the World ..

## ॥ हा न्याय असे जगताचा ॥

Comment: Whether it was Alexander the Great's attack on the East of Indus to acquire control over the wheat cultivation, rule of Joseph Stalin in erstwhile USSR, the American actions in Vietnam to Iraq or differential treatment offered by IMF to nuclear Russia vis-A-vis the poor African states they seem to follow a simple law of the world beautifully summarised by a Marathi Poet Justice D V Gadre allias kAvyavihArI in his simple but powerful poem "hA nyAya ase jagAcha" The poem was penned sometime between the late 1950 or 60s and it still stands the test of time. The poem is reproduced below.

हा न्याय असे जगताचा
कवी काव्यविहारी उर्फ धोंडो वासुदेव गद्रे

हा न्याय असे जगताचा ॥ धृ॥

रात्रंदिन ज्यांनी भ्यावे
पदतळी चुरडुनी जावे
त्यांच्याच कपाळी यावे
उन्मत्त, करुनि अन्याय उरावरि खुशाल नाचायाचा ॥ १॥

मार्गावर ठायी ठायी
हिंडतात गोगलगाई
जग तुडवी त्यांना पायी
परि नाग विषारी फणा काढुनी डौलाने जायाचा ॥ २॥

चिमुकली पाखरे सारी
पारबळे गरीब बिचारी
गांजिती तयांस शिकारी
बेगुमान बहिरी फिरे लुटारू तो गगनप्रांतीचा ॥ ३॥

मेंढरे, वासरे, गाई

कुणी त्राता ज्यांना नाही
काापिती अशांस कसाई
जंगलात घुसुनी कुणी उतरीना नक्षा वनराजाचा ॥ ४॥

भिजुनिया चिंब घामाने
खपुनि  जे पिकविती राने
ते मरती करभाराने
अत्तरी दिवे जाळतो छोकरा ऐदी श्रीमंताचा ॥ ५॥

किती मजूर गिरणीमधले
राबता राबता मेले
तळमळती त्यांची पोरे
मोटारी उडवित फिरे मिजासी परि मालक गिरणीचा ॥ ६॥

तोऱ्यात बलिष्ठ असावे
गरिबांनी फुकट मरावे
मत्तांनी त्यां तुडवावे
मामला चालला असाच मागे पुढती चालायाचा ॥ ७॥

हा न्याय असे जगताचा ॥

---

Encoded and proofread by
Surin Usgaonkar usgaonkar at hotmail.com

---

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated July 17, 2005